| नियमित दिवाणी दावा क्र.११८/२०२६ मधील निशाणी क्र.५९ खालील आदेश (डॉ. श्री. चंद्रकांत दत्तू शिंदे वि. डॉ. श्री. संजीव विरभद्र पाटील व इतर २३) | MHKO140005202026 |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) आणि (ड) अन्वये दाखल केलेला आहे.

२. **प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन असे की,** यातील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत दावा, दावा मिळकत मौजे. मजरे कार्वे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथील गट नं.३०५ क्षेत्र १ हे. ३५ आर. पैकी ० हे ५ आर. व त्यामधील ग्रा.पं.मि.नं.२६१ व ३११ या मिळकतीबाबत दाखल केलेला आहे.

३. सदरची दावा मिळकत ही चंदगड मेडीकल असोसिएशन या ट्रस्टच्या नावे आहे. सदर ट्रस्टची नोंदणी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांचा नोंदणी क्रमांक महाराष्ट्र कोल्हापुर एफ/५७२९ असा आहे. सदर संस्थेचे पुर्वीचे नाव क्वॉलिफाइड ॲड रजिस्टरर्ड प्रॅक्टीशनर असोसिएशन, चंदगड असा आहे. त्याचा नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/५८४१/कोल्हापूर असा होता. सदर नावामध्ये बदल करण्यासाठी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्याकडे अर्ज क्र.१८१८/२०२० असा नोंद करण्यात आला होता. त्याकामी दिनांक २२/१०/२०२१ रोजी आदेशाप्रमाणे नावामध्ये बदल करण्यात आला आहे.

४. सदर दावा मिळकत ही ट्रस्टच्या मालकीची असुन वादी दाव्यामध्ये सदर

मिळकतीचा मालक आहे व दाव्यामध्ये त्याचा हक्क व अधिकार असल्याबाबत हक्कज्ञापन व मनाईचा दावा दाखल केलेला आहे. वादी हे सदर संस्थेचे कायम आजीव सभासद असुन त्यांनी सन २०१० ते २०१३ व सन २०१३ ते २०२० या कालावधीमध्ये पदाधिकारी म्हणुन काम केले आहे. दावा मिळकत ही संस्थेने सन १९९० साली खरेदी घेतली असुन सन १९९८ ते १९९० च्या सुमारास बांधकाम केले आहे. त्यामुळे वादी सदर संस्थेचे सभासद म्हणुन समाविष्ट झाले. दावा मिळकत ही ट्रस्टच्या मालकीची असुन ट्रस्टच्या मिळकतीमध्ये वादी यांनी हक्क व अधिकारी मागता येणार नाही. तसेच ट्रस्टच्या मिळकतीबाबत वादी यांना मनाईसाठी दाद मागत आहेत. सदर दाव्यात ट्रस्ट पक्षकार नाही. तसेच सर्व सभासद पक्षकार नाहीत. सदर मिळकत ही ट्रस्टच्या मालकीची असल्याने सदर मिळकतीबाबत कोणतीही दाद दिवाणी कोर्टात मागता येणार नाही. तसेच अशा स्वरुपाचा दावा करण्यासाठी महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट ॲक्ट कलम ५० प्रमाणे मा. आयुक्त, कोल्हापूर यांची परवानगी न घेता सदरचा दावा दाखल केला असल्याने प्रस्तुतचा दावा या कार्टात चालु शकत नाही.

५. महाराष्ट्र पब्लीक ट्रस्ट ॲक्ट कलम ५० प्रमाणे ट्रस्टच्या मिळकतीबाबत मिळकत ट्रस्टची आहे किंवा नाही व त्यामध्ये वादी यांचा अधिकार आहे का ? वादी हे सभासद असल्याने मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्याकडे मागणे गरजेचे आहे. सदर दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडले नाही. त्यामुळे सदर दावा चालविण्याचा अधिकार मे. कोर्टाला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) आणि (ड) अन्वये दावा रद्द होण्यास पात्र आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

६. प्रस्तुत अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविण्यात आले. वादीतर्फे निशाणी क्र.५९

वर म्हणणे दाखल करुन प्रतिवादी यांच्या अर्जातील संपुर्ण कथने वादी यांनी नाकारली आहेत. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरचा दावा हा यातील वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई ताकीदीकरिता दाखल केला असुन सदर दाव्याचे मुळ स्वरुप हे दिवाणी स्वरुपाचे आहे आणि दिवाणी स्वरुपाचे अधिकार, निवारण करण्याचे संपुर्ण अधिकार या मे. कोर्टास अथवा दिवाणी न्यायालय यांना प्रदान करण्यात आले आहेत.

७. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी अगर त्यातील प्रत्यक्ष कब्जा वहिवाटीशी, कसलाही हक्क, संबंध नव्हता व नाही व किंबहुना यातील प्रतिवादी हे मिळकतीबाबतचे ट्रस्टी नव्हते व नाहीत. अशा परिस्थीतीत प्रतिवादी हे त्रयस्थ व्यक्ती असल्याने सदर प्रतिवादींविरुध्द दावा दाखल करण्यापुर्वी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्या पुर्व परवानगीची आवश्यकता भासत नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापुर्वी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांची पुर्व परवानगी घेतलेली नव्हती व नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

८. निर्णित करण्यासाठी उपस्थित झालेले प्रश्न, त्यावरील निष्कर्ष आणि त्यामागील कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे –

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) व (ड) ची बाधा येते काय ? | **होय.** |
| २) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

९. प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. बी. बी. घाटगे व वादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. एस.

जाधव यांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेख व उभयपक्षकारांतर्फे दाखल दस्ताऐवज यांचे सविस्तर अवलोकन केले.

१०. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पुष्ट्यार्थ खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतला. सर्व न्यायनिवाड्यांचे सविस्तर अवलोकन केले. भाषातंरामधील चुका टाळण्यासाठी न्यायनिर्णय इंग्रजी भाषेत घेण्यात येत आहेत. **1) Mehibubi Abdul Aziz & Ors. V/s. Sayed Abdul Majid & Ors. [2001(2) Mh. L.J.],** in this case Hon'ble High Court held that, Civil Court has no jurisdiction to decide whether certain property is of the public trust on the ground that, the question of title was complicated one.

**2) Tasadduq Husain Qureshi & Anr. Vs. Asif Abdul Bashar Qureshi & Ors. [2014(2) Mh. L.J.]**, in this case Hon'ble High Court held that, suit seeking relief involving around the administration of the trust and trustees and the trust persons interested are entitle to agitate the same but before appropriate forum under the scheme of Bombay Public Trust Act.

**3) Church of North Indian Vs. Lavaji Bhai Ratnaji Bhai [2005 AIR SC 2544],** in this case Hon'ble Supreme Court held that, the Civil Court will have no jurisdiction in relation to a matter where over the statutory authorities have the requisite jurisdiction.

११. वादीतर्फे कथनांच्या पुष्ट्यार्थ खालील न्यायनिवाड्यांचा आधार घेतला. सर्व न्यायनिवाड्यांचे सविस्तर अवलोकन केले. **1) Vivek Dev Idagunji & Ors. Vs. Shivram & Ors. (2005) 35 AIC 146,** in this case Hon'ble Supreme Court held that, suits asserting private hereditary rights, not public administration are maintainable in Civil Court without Charity Commissioner consent under the Bombay Public Trust Act. Perusal of record it appears that, the present suit is not relating to hereditary private rights of plaintiff and it prima-facie shows that, the present suit is filed

regarding public trust properties. The plaintiff has prayed declaration of the trust property. Hence, the facts of present case are altogether different. Therefore, with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**2) Vidharb Shatriya Mali Shikshan Sanstha Vs. Mahatma Fuley Shikshan Samiti, Amravati (1986) Mh. L.J. 773**, in this case Hon'ble Bombay High Court held that, the person seeking to enforce to it's own Civil right is competent and not bared by section 50 of the Bombay Public Trust Act. Facts are altogether different, hence with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**3) Smt. Yamunabai Dhankude, Sou. Kondabai Baburao Sakhore, Shri. Dashrath Chabaji Dhankude & Shri. Ramdas Chabaji Dhankude Vs. Shri. Raosaheb Mohanlal Chimanlal Maniyar Trust, (2012) 1 ALL MR 622,** in this case Hon'ble Bombay High Court held that, if Civil suit is filed by trustees is in ordinary Civil Court to protect trust property, such as seeking an injunction against a third party disturbing possession and the suit does not involve issues falling under the purview of section 50 of the BPT Act. The present suit is filed by plaintiff for declaration and injunction against defendants. Injunction is an consequential relief claimed by the plaintiff. On perusal of plaint it shows that, defendants are members of the trust. Prima-facie it seems that the defendants are not third party and they are trust members. Therefore, facts are altogether different, hence with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**4) The Breach Candy Swimming Bath Trust & Ors. Vs. Dipesh Mehta & Ors. (2015) 6 AIR Bom R 709**, in this case Hon'ble Bombay High Court held that, Civil Court has jurisdiction to grant interim relief in a suit concerning the right to administer a trust in defendant of the trial of the suit. Facts of present case are altogether different. Hence, with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**5) Shri. Uday Shantosh Kumar Deshmukh Vs. Sandip Ram Meghe, [(2016)4 AIR BomR 337],** in this case Hon'ble High Court held that, the Civil Court jurisdiction is not ousted by section 80 of the Bombay Public Trust Act. The present matter regarding illegal removal of life members of the trust. They are enforcing their personal Civil right regarding the termination of life membership. Here, the plaintiff has filed suit against other trust members and prayed for declaration and injunction. Therefore, facts are altogether different. Hence, with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**6) Shantidevi W/o. Laxmi Narayan Agrawal Vs. Seth Kasturmal Dalsukh Dharmashala, [(2019)1 AIR BomR 777],** in this case Hon'ble High Court held that, section 50 of the Trust Act, which is special forum, the provisions of Limitation Act, 1963 are not applicable to suit being filed u/sec.50 of the Trust Act, no limitation is provided for filing suit for declaration regarding trust property and possession of the trust property. In this case permission was obtained from the Charity Commissioner. However, in the present case the permission of Charity Commissioner is not obtained before institution of present suit. Hence, the facts of present case are altogether different. Therefore, with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

**प्रश्न क्र.१ करिता :-**

**१२.** प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन कथन केले की, वादी यांचे दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११(अ) व (ड) या तत्वाची बाधा येते. त्यामुळे प्रस्तुत दावा सदर तरतुदींन्वये खारिज होणेस पात्र आहे. एखादा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडले नसल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) अन्वये सदर दावा रद्द होणेस पात्र ठरतो. तसेच एखाद्या दाव्यास कायदेशीर तरतुदींची बाधा येत असल्यास सदर

दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (ड) अन्वये सदर दावा रद्द होणेस पात्र ठरतो. वादीतर्फे विधिज्ञ यांनी पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतला. **Bhau Ram Vs. Janak Singh & Ors. (2012) 117 AIC 2007,** in this case Hon'ble Supreme Court held that, while considering an application for rejection of a plaint under Order 7 Rule 11, the Court must only examine the averments made in the plaint itself. Pleas or materials from the defendants written statement cannot be considered. Therefore, the ratio is squarely applicable to the present case in hand.

**१३.** प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेतला. **Eldeco Housing and Industries Limited Vs. Ashok Vidyarthi & Ors. 2023 Live law (SC) 1033,** in this case Hon'ble Apex Court held that, no amount of evidence or merits of the controversy can be examined at the stage of decision of the application under Order 7 Rule 11 *C.P.C.*

वरील न्याय निर्णयातील निर्णय विचारात घेता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ निकाली काढत असताना प्रतिवादी यांची कैफियत विचारात न घेता वादीचे वादपत्रातील कथने विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच आदेश ७ नियम ११ कोणताही गुणवत्तेवर पुरावा न घेता निकाली काढणे आवश्यक आहे. यासाठी केवळ वादपत्रातील कथने विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.

**१४.** प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते २४ यांच्याविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. मौजे मजरे–कार्वे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर येथील भुमापन गट क्र.३०५ मधील क्षेत्र १ हे. ३५ आर यापैकी चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन या नावे असलेली ० हे. ५ आर मधील मजरे–कार्वे दप्तरी नोंद असलेली ग्रा.पं.मि.क्र.२६१ मधील ५६ X २६ चा आर.सी.सी. बांधकामाचा पहिला व दुसरा मजला व

ग्रा.पं.मि.क्र.३११ मधील पडसर खुली जागा १६३१ चौ.फुट. हा दाव्याचा वाद विषय आहे.

**१५.** वादपत्रातील कथनानुसार प्रतिवादी यांनी सन १९८९ साली "क्वॉलिफाइड ॲड रजिस्टरर्ड प्रॅक्टीशनर असोसिएशन, चंदगड " या नावे दिनांक २४/०५/१९८९ साली संस्था नोंदणी करुन त्याचे मुख्य फांउडर म्हणुन प्रतिवादी यांनी काम केले होते. सदरची विश्वस्त संस्था ही नोंदणी अधिनियम १८६० अन्वये महाराष्ट्र/५८४१/कोल्हापूर या रजिस्टर नोंदणी क्रमांकाने नोंदणीकृत झाली आहे. सदर संस्थेचे कामकाज चालु असताना प्रतिवादी यांनी परस्पर संस्थेच्या नावामध्ये बदल करुन "चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन, चंदगड " या नावे सन १९९४ पासुन पुर्वीचा नोंदणी क्रमांक वापरुन नवीन वैद्यकिय सभासदत्व करुन घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी सन १९९४ पासुन वादी यांचे सहकारी वैद्यकिय मित्र अनुक्रमे १ ते ६७ यांना सभासदत्व करुन घेतले. सन १९८७ साली वर नमुद प्रतिवादी यांनी सर्व सभासदांच्या वर्गणीमधुन मजरे–कार्वे येथील दावा मिळकत भुमापन गट क्र.३०५ मधील ५ गुंठे जागा चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन या नावे खरेदी घेतली.

**१६.** वादपत्रातील वरील मजकुर पाहता "चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन" ही नोंदणीकृत विश्वस्त संस्था असल्याचा बोध होतो. तसेच वादी प्रतिवादी हे सदर विश्वस्त संस्थेचे सभासद असल्याचे दिसुन येते. तसेच सदर नोंदणीकृत विश्वस्त संस्था यांनी भुमापन गट क्र.३०५ मधील जागा ही "चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन" या नावे खरेदी घेतली आहे, हे स्पष्ट होते. यावरुन दावा मिळकत ही विश्वस्त संस्थेची मालमत्ता आहे हे याठिकाणी स्पष्ट होत आहे. मान्य परिस्थीतीनुसार दावा मिळकत ही विश्वस्त संस्थेच्या नावे आहे. वादपत्रावरुन दावा मिळकत ही "चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन" या विश्वस्त संस्थेच्या मालकीची

असल्याचा स्पष्ट बोध होतो. अशा परिस्थीतीत दावा मिळकत वादी यांचे मालकीची आहे, दावा मिळकतीवर वादी यांचा हक्क व अधिकार आहे ? या बाबी चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयास आहे किंवा कसे ? हे पाहणे क्रमप्राप्त ठरत आहे. त्यासाठी वादी व प्रतिवादी यांनी युक्तीवादादरम्यान सादर केलेल्या कायदेशीर तरतुदी पाहणे आवश्यक आहे. भाषातंरामधील चुका टाळण्यासाठी इंग्रजी भाषेमध्ये तरतुद खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

***Section 50 of the Bombay Public Trusts Act:- Suit by against or relating to public trusts or trustees or others- in any case:-***

**(i)** where it is alleged that there is a breach of a public trust, negligence, misapplication or misconduct on the part of a trustee or trustees,

**(ii)** where a direction is required to recover possession of a property belonging to a public trust], [or the proceeds thereof or for an account of such property or proceeds] from any person including a person holding adversely to the public trust, or

**(iii)** where the direction of the court is deemed necessary for the administration of any public trust, the Charity Commissioner [after making such inquiry as he thinks necessary] or two or more persons having an interest in the trust and having obtained the consent in writing of the Charity Commissioner as provided in section 51 may institute a suit whether contentions or not in the Court within the local limits of whose jurisdiction the whole or part of the subject-matter of the trust is situate, to obtain a decree for any of the following reliefs: —

**(a)** an order for the recovery of the possession of such property [or proceeds thereof],

**(b)** the removal of any trustee or manager,

**(c)** the appointment of a new trustee or manager,

[(cc) vesting any property in a trustee,]

**(d)** a direction for taking accounts and making certain inquiries,

**(e)** a declaration as to what proportion of the trust property or of the interest therein shall be allocated to any particular object of the trust,

**(f)** a direction authorizing the whole or any part of the trust property to be let, sold, mortgaged or exchanged,

**(g)** the settlement of a scheme or variations or alterations in a scheme already settled, or

**(h)** granting such further or other relief as the nature of the case may require:

Provided that no suit claiming any of the reliefs specified in this section shall be instituted in respect of any public trust except in conformity with the provisions thereof:

[Provided further that the Charity Commissioner may, instead of instituting a suit, make an application to the Court for a variation or alteration in a scheme already settled.]

**Section 51 of the Bombay Public Trusts Act** (1) If the persons having an interest in any public trust intend to file a suit of the nature specified in section 50, they shall apply to the Charity Commissioner in writing for his consent. The Charity Commissioner, after hearing the parties and after making such inquiry as he thinks fit, may within a period of six months from the date on which the application is made, grant or refuse his consent to the institution of such suit. The order of the Charity Commissioner refusing his consent shall be in writing and shall state the reasons for the refusal.

(3) In every suit filed by persons having interest in any trust under section 50, the Charity Commissioner shall be a necessary party.

१७. वरील तरतुदींचे सविस्तर अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा विश्वस्त किंवा इतर यांच्याकडुन किंवा त्यांच्याविरुध्द किंवा त्यांच्याशी संबंधीत दावा दाखल केला असेल त्याबाबतीत हितसंबंधीत असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींना त्याबाबतीत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५१ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार मा. धर्मादाय आयुक्त यांची लेखी समंती मिळाल्यानंतर दावा दाखल करता येऊ शकतो.

१८. प्रस्तुत वादपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादीने दावा मिळकतीमध्ये त्यांचा हक्क व अधिकार आहे याबाबत हक्कज्ञापनासाठी व निरंतर ताकीद मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकत ही विश्वस्त मालमत्ता आहे, ही बाब वादपत्रातुन स्पष्ट होते. वादी सदर विश्वस्त मालमत्ता संदर्भात त्यांचा हक्क व अधिकार आहे याबाबत हक्कज्ञापनाची मागणी मागत आहे. दावा मिळकत ही विश्वस्त संस्थेच्या नावे आहे, ही बाब वादीच्या वादपत्रातुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे सदर विश्वस्त मालमत्तेबाबत हक्कज्ञापन न्यायालयाकडुन मागण्यापुर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५१ मधील तरतुदींन्वये मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांची पुर्व परवानगी आवश्यक आहे. प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी वादीने याबाबत मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांची पुर्व परवानगी घेतलेली नाही, हे मान्य केलेले आहे. वादीतर्फे बचावामध्ये असे कथन केले की, प्रतिवादी हे त्रयस्थ व्यक्ती असल्याने प्रस्तुतचा दावा दाखल करण्यापुर्वी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांचे पुर्व परवानगीची आवश्यकता नाही. वादीतर्फे बचावाच्या पुष्ट्यार्थ पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतला. **1) Gafoor Ali Hussain Through Legal Heirs Vs. Ram Mahadik & Ors. (2000) 1 ALL MR 153,** in this case Hon'ble Bombay

High Court held that, no prior consent of Charity Commissioner u/sec.51 is necessary for a suit filed by the trustees to recover trust property occupied by a trespasser.

**2) Adi Burjor Banaji Vs. Bakhtawar Maneksha Jijina, (2022) 5 ALL MR. 81,** in this case Hon'ble High Court held that, no Charity Commissioner permission required for suit by trustees against third party claiming adverse title.

I have gone through both these case laws. The present case in hand the plaintiff himself admitted that, the defendants are members of the trust and property involved in the present suit is trust property. Therefore, facts are altogether different, hence with respect to this authority the present case law is not applicable to the case in hand.

याउलट प्रतिवादीतर्फे पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतला. **1) Social & Cultural Association & Ors. Vs. State of Maharashtra [2014(4) Mh. L.J.],** in this case Hon'ble High Court held that, if rights is to be enforced against trust, consent of Charity Commissioner is necessary u/sec.50 of Bombay Trust Act.

**2) Rajesh Chunilal Meghani Vs. Andheri Recreation Club & Ors. [2014(4) Mh. L.J.],** in this case Hon'ble High Court held that, if subject matter of the suit come u/sec.50 of the BPT Act, the prior permission of Charity Commissioner for filing suit is mandatory and necessary as required u/sec.51 of the BPT Act.

I have gone through both these case laws. In present case the plaintiff claimed his right of declaration against trust property. Therefore, the ratio is squarely applicable to the present case in hand.

**१९.** एकंदरीत वादपत्रामधील कथनांवरुन व मान्य परिस्थीतीनुसार सदर विश्वस्त संस्था ही क्वॉलिफाइड अॅड रजिस्टरर्ड प्रॅक्टीशनर असोसिएशन, चंदगड या नावे नोंदणीकृत

झालेली आहे. सदर संस्थेच्या नावामध्ये चंदगड तालुका मेडिकल असोसिएशन या नावे बदल केलेला आहे. वादी स्वत: मान्य करत आहे की, प्रतिवादी यांचेप्रमाणेच दावा मिळकतीमध्ये वादी व त्यांचे सहकारी मित्र यांचा देखील हक्क व अधिकार आहे. तसेच प्रतिवादी हे त्रयस्थ इसमांना दावा मिळकत हस्तांतरण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सदर बाबी विचारात घेता प्रतिवादी हे सदर विश्वस्त संस्थेचे कायमस्वरुपी सभासद असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर विश्वस्त संस्थेच्या संदर्भातील सर्व वाद निवारण करण्याचे व चालविण्याचे अधिकार महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये प्रदान करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत दाव्यातील वादीची मागणी पाहता दावा दाखल करणेपुर्वी मा. धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांची पुर्व परवानगी आवश्यक असल्याचे दिसुन येते.

२०. प्रस्तुतचा वाद हा विश्वस्त व्यवस्था व विश्वस्त मालमत्ता सबंधी असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे तरतुदींन्वये आहे. वादीने विश्वस्त व्यवस्था यांना दाव्यात आवश्यक पक्षकार केलेले दिसुन येत नाही. कलम ८० प्रमाणे "अधिनियमात स्पष्टपणे जी तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, कोणत्याही, प्रश्नांचा निर्णय किंवा त्याबाबत कार्यवाही सदर अधिनियमान्वये किंवा तरतुदींनुसार, या अधिनियमाखाली काम करणा-या कोणत्याही अधिका-याने किंवा प्राधिका-याने करावयाची असल्यास त्यावर कार्यवाही करण्यास कोणतेही दिवाणी न्यायालयास अधिकारीता असणार नाही". यावरुन स्पष्ट होते की, सदर वाद दिवाणी न्यायालयाचे अधिकार क्षेत्राबाहेरील आहे. सबब, वादपत्रावरुन वादीचे दाव्यास महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०, ५१, ७९ व ८० मधील तरतुदींची बाधा येत असल्याचे दिसुन येत आहे. प्रतिवादीतर्फे दाखल उपरोक्त

न्यायनिर्णयातील निर्णय या वादतथ्यांना लागु होत आहे. अशा परिस्थीतीत वादीचे दाव्यास कारण घडले असा निष्कर्ष नोंदविता येणार नाही.

**२१.** वादीस पर्यायी (Efficacious remedy) उपलब्ध होती. परंतु, वादीने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम मधील तरतुदींन्वये पर्यायी न्यायालयात (Appropriate forum) मध्ये दावा दाखल न करता अथवा कोणतीही पुर्व परवानगी न घेता दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सबब, कलम ८० अन्वये दिवाणी न्यायालयास सदर दावा चालविण्याचे अधिकार नसलेने प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेल्या कथनांमध्ये तथ्य दिसुन येते. सबब, प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष **होकारार्थी** नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ करिता :-</u>**

**२२.** प्रश्न क्र.१ चा निष्कर्ष विचारात घेता प्रस्तुतचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ (अ) आणि (ड) या तरतुदींन्वये रद्द होणेस पात्र ठरत आहे. प्रश्न क्र.२ च्या निष्कर्षा दाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| (१) | प्रतिवादी यांचा निशाणी क्र.५९ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| (२) | येणेप्रमाणे निशाणी क्र.१ वर आदेश पारित करण्यात येत आहे. |
| | **(आदेश खुल्या न्यायालयात टंकलिखीत व घोषित करण्यात आला)** |

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.07.28 17:25:46 +0530

ठिकाणः चंदगड. **(ए.एन. सरक)**

दिनांकः २८/०७/२०२६. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चंदगड